**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४२००** **Email ID: ud७-urban@mah.gov.in**

**क्रमांक: एमआरडी-३३२३/प्र.क्र.-९७/नवि-७** **दिनांक : १ ऑगस्ट, २०२३**

**विषय** : महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब अन्वये महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्पांकरीता आकारण्यात येणा-या वाढीव शुल्काचा तपशील उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ** : १) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब.
२) शासन निर्णय क्रमांक : एमआरव्हीसी-३३१९/प्र.क्र.४८/नवि-७.
३) शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१९/प्र.क्र.०८ (भाग-२)/नवि-७.

महोदय,

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब (२-१अ) अन्वये राज्य शासनाने, एक किंवा त्यापेक्षा अधिक **महत्त्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प** हाती घेण्याचा आपला इरादा जाहीर केला असेल त्या बाबतीत या अधिनियमाखालील कोणत्याही नियोजन प्राधिकरणाच्या किंवा नवीन नगरविकास प्राधिकरणाच्या अधिकारितेखालील क्षेत्राच्या संबंधात, पोट- कलम (२) च्या तरतुदी अन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास आकारात, शंभर टक्क्यांनी वाढ करण्यात येईल.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन विभागामार्फत खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे विविध मेट्रो, मोनो व रेल्वे प्रकल्प "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प" (Vital Urban Transport Project) म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

**विवरणपत्र 'अ'**

| **अनु. क्र.** | **प्रकल्पाचे नाव (मार्गिकेचे नाव)** | **प्रकल्प मंजुरीचा दिनांक** | **महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प म्हणून घोषित केल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब (२-१अ) अन्वये | | | |
| १ | मुंबई मेट्रो मार्गिका २ अ : दहिसर-डी. एन. नगर | १७.१०.२०१५ | ०१.०३.२०१७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मुंबई मेट्रो मार्गिका २ ब : डी. एन. नगर -मंडाले | २५.१०.२०१६ | ०१.०३.२०१७ |
| ३ | मुंबई मेट्रो मार्गिका ३ : कुलाबा-सिप्झ - वांन्द्रे | ०३.०३.२०१४ | ०१.०३.२०१७ |
| ४ | मुंबई मेट्रो मार्गिका ४ : वडाळा - कासारवडवली | २५.१०.२०१६ | ०१.०३.२०१७ |
| ५ | मुंबई मेट्रो मार्गिका ४ अ : कासारवडवली - गायमुख | २५.०१.२०१९ | ३१.०७.२०१९ |
| ६ | मुंबई मेट्रो मार्गिका ५ : ठाणे - भिवंडी- कल्याण | २१.१२.२०१७ | ३१.०७.२०१९ |
| ७ | मुंबई मेट्रो मार्गिका ६ : स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी | २१.१२.२०१७ | ३१.०७.२०१९ |
| ८ | मुंबई मेट्रो मार्गिका ७ : दहिसर (पूर्व) — अंधेरी (पूर्व) | १७.१०.२०१५ | ०१.०३.२०१७ |
| ९ | मुंबई मेट्रो मार्गिका ७ अ : अंधेरी - CSIA | ०२.११.२०१८ | ३१.०७.२०१९ |
| १० | मुंबई मेट्रो मार्गिका ९ : दहिसर — मीरा भाईंदर | | |
| ११ | पुणे मेट्रो प्रकल्प - १ (पिंपरी चिंचवड — स्वारगेट आणि वनाज - रामवाडी) | २३.१२.२०१६ | १०.०५.२०१८ |
| १२ | पुणे मेट्रो प्रकल्प -३ (हिंजवडी - शिवाजीनगर) | ०९.०२.२०१८ | १८.०७.२०१८ |
| १३ | पुणे मेट्रो प्रकल्प १अ (पिंपरी चिंचवड - निगडी) | १२.०३.२०२१ | ३१.०७.२०१९ |
| १४ | नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प -१ | ३०.०१.२०१४ | ३०.०६.२०१६ |
| १५ | नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प -२ विस्तारीत मार्गिका | १४.०१.२०१९ | ३१.०७.२०१९ |
| १६ | ठाणे मेट्रो — प्रस्तावित नवीन ठाणे — नवीन ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग | ०८.०३.२०१९ | ३१.०७.२०१९ |
| १७ | मोनोरेल प्रकल्प (संत गाडगे महाराज चौक - चेंबूर) | ०१.११.२००८ | ३१.०७.२०१९ |
| १८ | एमयुटीपी - ३ प्रकल्प<br>१) पनवेल - कर्जत, २) विरार - डहाणु | ०७.०१.२०१७ | ३१.०७.२०१९ |

सदर प्रकल्प हे ज्या नियोजन प्राधिकरणाच्या किंवा नगरविकास प्राधिकरणाच्या अधिकारितेखालील क्षेत्रात येतात, त्या प्राधिकरणांद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम १२४ ब (२-१अ) च्या तरतुदीन्वये वसूल करण्यात आलेल्या विकास आकारात, शंभर टक्क्यांनी वाढ करणे आवश्यक आहे.

उपरोक्त विवरणपत्र-अ प्रमाणे घोषित प्रकल्पांना निधी उभारण्यासाठी त्या त्या संस्थांच्या स्तरावर "समर्पित नागरी परिवहन निधी" उभारावयाचा आहे. सदर निधी मधून महत्वाकांक्षी नागरी परीवहन प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. तरी आपल्या कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर

रचना अधिनियम, १९६६ कलम १२४ ब (२-१अ) च्या तरतुदीन्वये वसूल करण्यात आलेल्या १०० टक्के वाढीव विकास शुल्काचा तपशील संलग्न केलेल्या विवरणपत्र 'ब' मध्ये शासनास दिनांक ०७.०८.२०२३ रोजी पर्यंत **ud7-urban@mah.gov.in** या ई-मेल आयडीवर उपलब्ध करुन देण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(अजयसिंग पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२. व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ ( सिडको), बेलापूर, नवी मुंबई.
३. अध्यक्ष, मुंबई पत्तन प्राधिकरण ( मुंबई पोर्ट ट्रस्ट), मुंबई.
४. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
५. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई
६. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
७. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.
८. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई / नागपूर / पुणे.
१२. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, नागपूर / पुणे.
१४. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे
१५. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड.
१६. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.
१७. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
१८. अध्यक्ष, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
१९. विकास आयुक्त, मिहान ( मल्टीमोडल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट), नागपूर.
२०. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
२१. आयुक्त, नशिक महानगरपालिका, नाशिक.
२२. आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल
२३. आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
२४. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मिरा भाईंदर.

२५.आयुक्त, भिवंडी-निझामपूर महानगरपालिका, भिवंडी.
२६.आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका, वसई-विरार.